माहिती व जनसंपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका
03/10/2025

कृपया प्रसिध्दी करिता

पुणे महानगरपालिका

उद्यान विभाग

"प्रेसनोट"

## "कोजागिरी पौर्णिमा" निमित्त पुणे महानगरपालिका हद्दीमधील उद्यानांच्या वेळेत वाढ करणेबाबत

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (१०) अन्वये , सार्वजनिक उद्याने, बागा ,मनोरंजनासाठी मोकळ्या जागांची तरतूद करणे, नागरिकांच्या मनोरंजनासाठी उद्याने /बागा उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. पुणे महानगरपालिका अधिकार क्षेत्रामध्ये उद्यान विभागामार्फत एकूण २१६ उद्याने, एक मत्सालय व एक प्राणी संग्रहालय विकसित करण्यात आलेले आहेत. सदर उद्यानांमध्ये नागरिक / लहान मुले ,परदेशी नागरिक मोठ्या प्रमाणवर भेट देत असतात.

सोमवार दिनांक ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी "कोजागिरी पौर्णिमा" असून पुणे शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उद्यानांमध्ये भेट देत असतात. सबब पुणे शहरातील सर्व नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते कि, सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षी "कोजागिरी पौर्णिमा" निमित्त पुणे महानगरपालिका हद्दीमधील उद्याने सकाळी ६.०० ते ११.०० व सायंकाळी ४.३० ते रात्री १२.०० वा. उघडी ठेवण्यात येणार आहे.तरी पुणे शहरातील नागरिकांनी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

03/10

(डॉ.अशोक दि.घोरपडे)
सह-महापालिका आयुक्त
उद्यान विभाग
पुणे महानगरपालिका